दाखल तारीख ०३/०२/२०१७
नोंदणी तारीख ०३/०२/२०१७
निकालतारीख १६/०५/२०१९
कालावधी ०२ वर्ष, ०३ महिने, १३ दिवस

**<u>पुणे यथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय पौड यांचे न्यायालयात.</u>**
(पीठासीन अधिकारी : एस. व्ही. थोडगे)

**नि.फौ.ख.नं.५८३/२०१७**

**नि...........**

CNR: MHPU04-005444-2017

महाराष्ट्र शासन, तर्फे　　　**...अभियोग पक्ष**
पोलीस ठाणे अंमलदार,
पौड पोलीस ठाणे,
तालुका मुळशी, जिल्हा पुणे.

**विरुध्द**

बसवराज मारूती भंडारी
वय ४६ वर्षे, धंदा —मजुरी
रा. कोळवण,
ता. मुळशी, जि. पुणे.　　　...**आरोपी**

**<u>महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये.</u>**

---

सहाय्यक सरकारी वकील — श्रीमती. बी.एन. पेटकर
आरोपीतर्फे — श्रीमती सी.पी.सेठ

---

**<u>न्यायनिर्णय</u>**
**<u>(घोषित दिनांक १६/०५/२०१९)</u>**

आरोपीचे विरुध्द महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये असलेल्या गुन्हयाचा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे,**

१. दि. २१/०७/२०१६ रोजी पो.हवा.मगर यांना सनी हॉटेल समोरील रस्त्याच्या पलीकडे बाभळीच्या झाडाखाली, कोळवन गावच्या हददीमध्ये, ता. मुळशी, जि. पुणे येथे आरोपी अवैधरित्या ताडीची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरून पो.हवा. मगर, पंच साक्षीदार आणि सुनिल बापुराव कदम पो.कॉ. खाजगी वाहनाने घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी त्यांना आरोपी ताडीची विक्री करीत असताना आढळून आला. घटनास्थळावरील मुददेमाल जप्ती पंचनामा करून जप्त करण्यात आला. सदर घटनेची फिर्याद सुनिल बापुराव कदम पो.कॉ. यांनी पौड पोलीस स्टेशन येथे दिली.

२. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरुध्द गु.र.न.१८९/२०१६ महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे नोंद झाला. पो. हवा. एस.टी.मगर यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासकामी त्यांनी साक्षीदारांची टिपणे नोंदविली, मुददेमालाचा जप्तीपंचनामा तयार केला आणि संपूर्ण तपासांती आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीविरूध्द निशाणी ८ अन्वये महाराष्ट् दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीने दोषारोप नाकारून संपरिक्षेची विनंती केली.

३. माझे समोर उपस्थित झालेले मुद्‌दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | <u>**मुददे**</u> | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी ताडीची अवैध विक्री करीत होता? | **नाही.** |
| २ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

४. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीचे विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ —फिर्यादी— सुनिल बापुराव कदम साक्ष (नि.१०) नोंदविण्यात आली. नि.क्र.१ च्या आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींचा फौजदारी प्रक्रीया संहीताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब निशाणी क्र. १४ वर नोंदविण्यात आले.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>**:—

५. साक्षीदार क्र. १ पो.कॉ. सुनिल बापुराव कदम हे फिर्यादी आहेत. त्यांनी पुराव्यात सांगितले की, दि.२१.०७.२०१६ रोजी ते पौड पो. स्टे. येथे पो. कॉ. म्हणून कार्यरत होते. पोलीस हवालदार मगर यांना मिळालेल्या माहितीवरून त्यांनी पंच साक्षीदारांसह कोळवण गावच्या हददीमध्ये, सनी हॉटेल समोर छापा घातला. तेथे त्यांना आरोपी ताडीची अवैध विक्री करत असल्याचे निदर्शनास आले. आरोपीला त्यांची चाहूल लागताच आरोपी तेथून पळून गेला. त्याच्या ताब्यातील कॅनची पाहणी केली असता त्यामध्ये १० लिटर ताडी आढळून आली. सदर मुददेमाल दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा निशाणी क्र. १२ तयार

करून जप्त केला. जप्त मुददेमालापैकी १८० मिली द्रव्य रासायनिक पृथकरणाकरीता वेगळा नमुना वेगळा काढला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द फिर्याद निशाणी ११ दिली.

७. अभिलेखावर कुठल्याही स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब तपासादरम्यान नोंदविला असल्याचे दिसून येत नाही. अभिलेखावर जप्त करण्यात आलेले द्रव्य हे मदय होते हे सिध्द करण्याकरता रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल देखील अभिलेखावर दाखल नाही.

८. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ चे ६५(ई) च्या सिध्दतेसाठी हस्तगत केलेला मुद्येमाल ही ताडी होती हे सिध्द करण्याकरीता रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे आरोपीचा ताडी या द्रव्यावर सजग ताबा होता हे सिध्द होत नाही. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>:—**

९. अभियोग पक्षातर्फे आरोपीला दोषी धरण्यासाठी लागणारा सबळ पुरावा सादर करण्यात आला नाही त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी बसवराज मारूती भंडारी याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) अन्वये महाराष्ट्र दारू प्रतिबंधात्मक कायदा, १९४९ कलम ६५(ई) चे गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. गुन्हयात जप्त करण्यात आलेला मुददेमाल अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ नुसार प्रत्येकी रू. १५,०००/— चे वैयक्तिक व जामीनबंधपत्र दयावे जे सहा महिन्याकरीता अंमलात राहील.

पुणे.
दिनांक: १६/०५/२०१९

**(एस. व्ही. थोडगे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पौड कोर्ट, पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

Name of the Court :- Shri. S. V. Thodge
Judicial Magistrate, First
Class, Paud Court, Pune.

Name of the Steno :- P.V.Satpute, (L. G. Stenographer)

Date of Judgment :- 16/05/2019

Judgment signed by
presiding officer :- 16/05/2019

Judgment uploaded on :- 16/05/2019